Regd.No.OSM.36/78,Dt.30/09/1978,F-312L
Hindustani Education Society's Ausa
Sharadchandra Mahavidyalaya Shiradhon
Tq.Kalamb Dist.Osmanabad -413 528
(Minority Status)
NAAC Accredited 'B' Grade,ISO 9001:2015
संस्था नोंदणी क्र.ओ.एस.एम.३६/७८ दि.३०/०९/१९७८ एफ-३१२
हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित,
शरदचंद्र महाविद्यालय,शिराढोण
ता.कळंब जि.उस्मानाबाद - ४१३५२८
Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University,Aurangabad.

Ref.No.SMS/ Date : 02/08/2021

College Code -184

Letter of Intent (LOI)

## MEMORANDUM OF UNDERSTANDING FOR ACADEMIC COOPERATION

**Between**

Hindustani Education Society, Ausa'
**SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON**
Tq. Kalamb Dist. Osmanabad- 413528 (Maharashtra)
(Minority Status) NAAC "B" Grade
(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

**And**

**BABURAO ADASKAR MAHAVIDYALAYA, KAIJ**
Tal. Kaij Dist. Beed (Maharashtra)
(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

Hindustani Education Society Ausa' Sharadchandra Mahavidyalaya, Shiradhon and Baburao Adaskar (Vasant) Mahavidyalaya, Kaij Tal. Kaij Dist. Beed have agreed into this Memorandum of Understanding on dated 02/08/2021 for the mutual cooperation for the academic and cultural development.

**Purpose:-**

The purpose of this agreement is to promote cooperation in higher education and cultural development on both campuses and to stimulate and facilitate the development of collaborative and mutually beneficial programmes.

**Article 1:-**

Through this Memorandum, both parties affirm the value of cooperation for educational and cultural development and agree to promote the following activities.

1. To exchange students for academic development through various activities.
2. To exchange faculties, give opportunities for staff development.
3. To invite guest lecturers.
4. To arrange various programmes related to N.S.S., sports and cultural development.
5. To avail library for research development.
6. Other forms of cooperation made by mutual agreements.

**Article 2:-** INTRODUCTION. This Memorandum of Understanding (MoU) is made between IQAC of this institution and Vasant Mahavidyalaya, Kaij Tal. Kaij Dist. Beed are referred to herein as "the Parties" to this MoU.

1. The Parties intend by this MoU to establish a mutually beneficial partnership.
2. This MoU will address the basic relationship, roles and responsibilities of the Parties but leaves for later agreement the more precise terms that will constitute the substance of the partnership.
3. The MoU also provide scope of adding further trusts/foundations/colleges/NGOs in future

**Article 3:- Terms and conditions:-**

This agreement shall become effective from the date of its signing by the representatives of both institutions and shall remain in effect for five years and can be extended by the written mutual consent. Either side may terminate this agreement at any time by given written notice in six months advance to the other.

Name, Signature & Designation

PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalay
Shiradhon, Tq. Kallamb

**Dr. G. D. Birajdar**
**Principal**
Sharadchandra Mahavidyalaya, Shiradhon
Dist. Osmanabad
Mobile no. 9518781528

Name, Signature & Designation

PRINCIPAL
Baburao Adaskar Mahavidyalaya
Kaij, Tq. Kaij, Dist. Beed.

**Dr. M. G. Fawade**
**Principal**
Vasant Mahavidyalaya, Kaij
Dist. Beed
Mobile no. 9860016283

**Date:** 02.08.2021

**Place:** Shiradhon

Regd. No.OSM.36/78, Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society, Ausa'
**SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON**
**Tq. Kalamb Dist. Osmanabad- 413528**
Email- pri.smsshiradhon@gmail.com

(02383) 220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित
**शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण**
ता. कळंब जि. उस्मानाबाद - ४१३५२८
Website- www.sharadchandracollege.org

(Minority Status)
**NAAC Accredited "B" Grade**
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

**Principal**

**Dr. G.D. Birajdar**
**Ph.D.**

Ref. SMS/ 442/A

Date: 02/08/2021

To,
**The Principal,**
Vasantdada Mahavidyalaya, Kaij
Tal. Kaij Dist. Beed

**Subject:** Letter of Intent (LOI) for Memorandum of Understanding.

**Respected Sir,**

With the above cited subject, we request to you that our college has decided to make the agreement of **Memorandum of Understanding** with you as per guidelines of NAAC for academic and cultural development. Both colleges will mutually benefited by this initiative. This MOU will be for academic and cultural cooperation. Looking forward for future endeavors. Kindly cooperate and do the needful.

Thanking You.

PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalay
Shiradhon Tq.Kallamb

Yours faithfully

Regd. No.OSM.36/78, Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society, Ausa'
SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON
Tq. Kalamb Dist. Dharashiv- 413528
Email- prsmsshiradhon@gmail.com

(02383) 220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण
ता. कळंब जि. धाराशिव- ४१३५२८
Website- www.shms.ac.in

(Minority Status)
NAAC "B" Grade & ISO Certified
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

College Code -184

Ref. No.-SMS/20 167 /

Date:- 18 /09 /2021

To,

Dr./Mrs./Mrs. Dr. Bhosle A. R.
Baburao Aadasakar M.
Kaij.

**Subject:-** Letter of Appreciation.

**Respected Sir,**

Our college and especially department of Sports thanks you very much for delivering and informative and thought-provoking lecture as Chief Guest in a Program on the occasion of आमंत्रित शाळा मंडळ अध्यापन. organized on 18/09/2021 in our college. It was really a splendid demonstration. We are looking forward for your cooperation in academic development in future as well.

Thanking You.

Principal
PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalay
Shiradhon,Tq.Kallamb

Regd. No.OSM.36/78, Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society, Ausa'
**SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON**
**Tq. Kalamb Dist. Dharashiv- 413528**
Email- pri.smsshiradhon@gmail.com

(02383) 220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित
**शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण**
ता. कळंब जि. धाराशिव- ४१३५२८
Website- www.shms.ac.in

(Minority Status)
**NAAC "B" Grade & ISO Certified**
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Sharadchandra Mahavidyalaya Shiradhon Tq. Kallam ★ College Code -184

Ref. No.-SMS/20 160 /

Date:- 15 /09 /2021

**To,**

**Dr./Mrs./Mrs.** Dr. Bhosle. A. R
Baburao Adasakar Mahavidyalaya
Kaij

**Subject:-** Invitation as a Chief Guest on the occasion of सामाजिक शास्त्र मंडळ उद्घाटन
on 18/09/2021.

**Respected Sir,**

With the subject cited above, We are glad to inform you that you are being invited as a Chief Guest in a Program on the occasion of सामाजिक शास्त्र मंडळ उद्घाटन. **on** 18/09/2021 organized in our college. Hence you are requested to accept our invitation and share your ideas and demonstrations which will enlighten to our students as well staff.

So kindly accept the invitation and grace your presence.

Thanking You

Principal

PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalay
Shiradhon,Tq.Kallamb

Regd. No.OSM.36/78, Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society, Ausa'
SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON
Tq. Kalamb Dist. Dharashiv- 413528
Email- pri.smsshiradhon@gmail.com

(02383) 220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण
ता. कळंब जि. धाराशिव- ४१३५२८
Website- www.shms.ac.in

(Minority Status)
NAAC "B" Grade & ISO Certified
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Sharadchandra Mahavidyalaya Shiradhon Tq. Kallam ★ College Code - 184

Ref. No. SMS/20 28 /

Date:- 12 /01 /2023

**To,**

**Dr./Mrs./Mrs.** Bhosle. A R
Baburao Aadsakar. M.
Kalj.

**Subject:-** Letter of Appreciation.

**Respected Sir,**

Our college and especially department of Sports thanks you very much for delivering and informative and thought-provoking lecture as Chief Guest in a Program on the occasion of महिला मेळावा organized on 12/01/2023 in our college. It was really a splendid demonstration. We are looking forward for your cooperation in academic development in future as well.

Thanking You.

Principal

I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Tq Kallam

Regd. No.OSM.36/78, Dt. 30/09/1978, F-312L
Hindustani Education Society, Ausa'
**SHARADCHANDRA MAHAVIDYALAYA, SHIRADHON**
**Tq. Kalamb Dist. Dharashiv- 413528**
Email- prl.smsshiradhon@gmail.com

(02383) 220276, 220093 Fax- 220093
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी औसा संचलित
**शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण**
ता. कळंब जि. धाराशिव- ४१३५२८
Website- www.shms.ac.in

(Minority Status)
**NAAC "B" Grade & ISO Certified**
Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

Sharadchandra Mahavidyalaya Shirdhon Tq. Kallam ★ College Code -184

Ref.No.-SMS/20 25 /

Date:- 07 / 01/20 23

**To,**

**Dr./Mrs./Mrs.** Bhosle. A R.
Baburao Aadaskar. M.
Kaij.

**Subject:-** Invitation as a Chief Guest on the occasion of महिला सक्षमीकरण on 12/01/2023.

**Respected Sir,**

With the subject cited above, We are glad to inform you that you are being invited as a Chief Guest in a Program on the occasion of महिला सक्षमीकरण **on** 12/01/2023 organized in our college. Hence you are requested to accept our invitation and share your ideas and demonstrations which will enlighten to our students as well staff.

So kindly accept the invitation and grace your presence.

Thanking You

Principal

I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Tq Kallam

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol (II)

12 January 2019 Special Issue – 68

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय



**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Prof. A.R. Bhosle
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. S.K. Gaike
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION

Visit to - www.researchjourney.net

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा. डॉ. रमेश मा. सरपाते | ७ |
| 2. | कौटुंबिक हिंसाचार आणि भारतीय स्त्रिया | शेख शहारुख फारुख | 9 |
| 3. | मराठी काव्यातुन येणा-या स्त्री जाणिवा | डॉ.चत्रभुज नारायणराव सोळंके | 11 |
| 4. | महिला सबलीकरण | प्रा. अभिजीत गोपाळघारे | १४ |
| 5. | स्त्रियांच्या चळवळी : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. गायत्री सोपानराव गाडेकर | १५ |
| 6. | स्त्रीवादी अभ्यास : विकास आणि स्त्रिया | डॉ. अरुणा सावरगांवकर | 20 |
| 7. | कौटुकिब हिसाचार : एक सामाजिक समस्या | खेत्री नवनाथ विश्वनाथ | 22 |
| 8. | महिला सशक्तीकरण : घरेलू हिंसा के संदर्भ में | प्रा.डॉ.पुरुषोत्तम भ.मनगटे | 25 |
| 9. | हिंदी साहित्य में स्त्रीवाद | प्रा.राजेगोरे आर.व्ही. | 28 |
| 10. | कौटुंबिक हिंसाचार कायदा आणि ग्रामीण स्त्री: एक चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. बामणे मारोती मोतीराम | 30 |
| 11. | महिला सबलीकरण: सामाजिक दृष्टीक्षेप | डॉ. दगडू नरसिंगराव दामावले | 32 |
| 12. | स्त्रीभुणहत्या प्रतिबंध व प्रबोधन | डॉ. वितेश भारत निकते | 34 |
| 13. | महिला सबलिकरणाच्या समस्या : आवाहाने आणि उपाय | प्रा.डॉ.आलटे शशीकांत मुकूंदराव | 37 |
| 14. | भारतातील महिला सक्षमीकरणाचा अभ्यास | प्रा.डॉ.एस.जी.गव्हाणे | 39 |
| 15. | मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराचा अभ्यास | डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड | 41 |
| 16. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. शितल येरुळे | ४५ |
| 17. | कौटूंबिक हिंसाचारापासून स्त्री मुक्त होईल का | प्रा. आहिल्या अंबादास फेदराम | ४७ |
| 18. | लिंगभेद आणि स्त्री जीवन | प्रा. डॉ. सतीश गंगाराम सराणे | ५० |
| 19. | कौटुंबीक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. डॉ.बालासाहेब विश्वनाथ मुंडे | 53 |
| 20. | भारतीय समाजातील महिलांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा.डॉ.विद्या खंडारे-गोवंदे | 55 |
| 21. | महाराष्ट्राचे महिला विकास धोरण व महिला सक्षमीकरण | प्रा. यादव जे.वी. | 57 |
| 22. | जागतिकीकरणाचे महिलावरील परिणाम | डॉ. मानवते उत्तम हुसनाजी | 61 |
| 23. | स्त्रियांवरील अत्याचार एक सामाजिक समस्या | वर्चे कमल दिगांबर | 63 |
| 24. | महिला सबलीकरण : समस्या, आव्हाने आणि उपाय<br>"जागतिकीकरण आणि स्त्रिया" | डॉ. कालिदास मारुती भांगे | 66 |
| 25. | जागतिकीकरण आणि स्त्रिया | डॉ.दाडगे सुरेखा वैजनाथराव | 70 |
| 26. | हुंडा – प्रथा, समाज आणि स्त्रिया | प्र.प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख | 72 |
| 27. | लिंगभाव : एक सामाजिक मानसिकता | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 74 |
| 28. | लिंगभाव असमानता : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. एम.के. राखोंडे | 76 |
| 29. | भारतातील समाजशास्त्र आणि लिंगभाव | डॉ. अप्पाराव रामराव वागडव | 78 |
| 30. | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री | प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे | 80 |
| 31. | कौटुंबिक हिंसाचार विरोधी संरक्षण कायदा | प्रा. वैशाली माधवराव दिवे | 83 |
| 32. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.अनिल म्हाळाप्पा गाडेकर | 85 |
| 33. | महिला सशक्तीकरण : घरेलू हिंसा के संदर्भ में | प्रा.डॉ.पुरुषोत्तम भ. मनगट | 87 |
| 34. | महिला सबलीकरण समस्या–आव्हाने आणि उपाय. | पावले शिवाजी दिलीप | 90 |
| 35. | लिंगभाव विषमत्ता आणि भारतातील स्त्रीदास्य | प्रा.डॉ.गोरे बी. एम. | 92 |
| 36. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | प्रा. मोरे पंडित किशनराव | 94 |
| 37. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सोनटक्के रमेश शंकरराव | 96 |
| 38. | जागतिकीकरण आणि स्त्रिया | प्रा.सुजाता आर.नाईक | ९९ |
| | आदिवासी विधवा महिलाओंके पती मृत्यु के पश्चात निर्माणाधिन समस्याओं का अध्ययन (विशेष संदर्भ –किनवट तालुका जि.नांदेड, महाराष्ट्र, भारत) | राठोड वसंत भाऊराव, | 103 |

# महिला सबलिकरणाच्या समस्या : आवाहाने आणि उपाय

प्रा.डॉ.आलटे शशीकांत मुकूंदराव
समाजशास्त्र विभाग प्रमुख, शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण, ता. कळंब, जि .उस्मानाबाद.

---

**प्रस्तावना :-**

19 व्या शतकात अनेक भारतीय समाजसुधारकांनी स्त्रियांना भारतीय समाजात दिल्या जानाऱ्या दुय्यम वागणुकीचा प्रश्न उपस्थीत केला. विशेषत: आधुनिक भारताच्या जडनघडणीत स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयक्ष कृती केली पाहिजे. ही जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच निर्माण केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढत होता. हे प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अनुभवले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राज्यघटने नुसार कायद्यानुसार स्त्री-पुरुषांना समान लेखले गेले श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव इत्यादी समस्या सुटन्याची भवना जनतेच्या मनात निर्माण झाली होती. ही भावना कृतीने सिध्द करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या त्यांच्या कार्यामुळे प्राचिन काळापासून दास्यात असलेल्या स्त्रियांना मुक्ती मिळण्याची स्वप्न दिसू लागली त्यांनी घटनेच्या आणि चळवळींच्या माध्यमातून स्त्री मुक्तीचा प्रत्यक्ष प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील अनेक समित्यांनी काढलेल्या निष्कर्षांमध्ये स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या भीषण विषमतेचा निर्देश झाला आहे. म्हणून स्त्री सबलीकरणाच्या संकल्पनेची सैध्दांतिक मांडनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामधून करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

प्राचीन काळातील स्त्रीचा सामाजिक दर्जा अथवा स्थान पाहता या काळात स्त्रीचा क्रय-विक्रय होत होता राजाला आणि देवाला दासी म्हणून स्त्री अर्पण केली जात होती. बालविवाहाची, केशवपनाची, सती जाण्याची प्रथा समाजात रुढ केली होती. पुरुपास बहुपत्नीत्वाची मुभा होती तर विधवा स्त्रीस पुर्नविवाहाची बंदी होती. स्त्रीला दत्तक जाण्याचा व घेण्याचाही अधिकार नव्हता. स्त्रीवर लादलेल्या या निर्बंधाचा रुढी-परंपरा, देवधर्म, संस्कृती, आणि भारतीय विविध सामाजिक संस्थांचा सर्व अंगाने अनैसर्गीक आधार पुरुषीसत्ता व व्यवस्थेने दिला होता. वैदिकपूर्व व बौध्द प्रभावांचा कालखंड सोडता, प्राचीन कालखंड हा स्त्रियांना अमानुष गुलामी लादनारा होता. अज्ञान-अंध-श्रध्देत जखडनारा होता.

पेशवेकाळाचा अस्त आणि इंग्रजांचा अमल हा कालखंड आधुनिक भारताची पायाभरणी करणारा होता. इंग्रज सत्तेने भारतीय समाजाला शिक्षण, स्वातंत्र्य दिले. ख्रिश्चन मिशनरींनी मानवता बंधुता व धर्म सुधारणा या गोष्टी भारतीय समाजात रुजविण्यास आरंभ केला. यातुनच पुढे भारतीय स्त्री उध्दारासाठी सबलीकरणासाठी अनेक भारतीय समाज क्रांतीकारक प्रबोधक पुढे आले व इंग्रजी सत्तेकडून स्त्री सबलीकरणाचे कायदे करुन घेण्यास आरंभ झाला. यातच स्त्री शिक्षणाचा पायाही रोवला गेला. सती सारखी अमानुष प्रथाही बंद करणारे कायदे राजाराम महोन रॉय यांच्या पुढाकाराणे अंमलात आले. स्त्री शिक्षणाचा पाया घालणारे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलभुत परिवर्तनाचा आरंभ केला. याच श्रंखलेची महत्वपूर्ण कडी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रथम भारतीय संवीधानात व नंतर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री सबलीकरणाच्या अनेक क्रांतीकारक तरतुदी मांडल्या आणि बौध्द धम्माचे पुनरुज्जीवन करुन स्त्री शुद्रातिशूद्रांच्या मानवी दास्यांचा अंत करुन समता, स्वातंत्र्य बंधुतेचा आरंभ केला.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळून सहा दशके होत आहेत. तरीही भारतीय स्त्री सती जाण्याचे प्रकार घडत आहेत. स्त्रीयांचा छुप्पा पध्दतीने क्रय सुरुच आहे. देवदासी बालविवाह ही प्रथा पूर्णत: बंद झालेली दिसत नाही. वडिलांच्या संपतीमध्ये स्त्रीला घटनेने अधिकार दिला असला तरी व्यवहारात मात्र तो नगन्यच आहे. दररोज हुंडाबळी, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार, बारबाला, देहविक्री, स्त्रीभ्रूणहत्या या सर्व माध्यमातून बळी जानाऱ्या स्त्रीयांची संख्या भयावह आहे. शासन प्रशासनात या स्त्री वर्गाला 33 टक्के सत्तेत आरक्षण मागू पाहनारेच बिल संसदेत अनेक वर्षापासून आडकले आहे. हे सर्व समाज वास्तव भारतीय स्त्रीलाच विकलांग करत नसून संबंध कुटुंब समाज व राष्ट्रालाच विकलांग, खंडीत, अशात व अप्रगत ठेवनारे आहे. या संबंध स्थितीला प्राचीन काळापासून पुरुषी सत्तेची धर्म संस्कृतीच्या नावे समाज संस्थेत रुजलेली मुळे कारण ठरत आहेत.

**महिला सबलीकरणाचा अर्थ :-**

अबला महिलांना सबला करण्यासाठी त्यांना समान संधी देण्यासाठी चा विचार मांडने म्हणजे महिला सबलीकरण होय सामाजिक व आर्थिक दृष्ट्या स्त्रियावरील अन्याय व अत्याचार दूर करुन त्यांना न्याय मिळवुन देणे म्हणजे महिला सबलिकरण होय. महिला सबलीकरण ही प्रक्रिया स्त्रियाबध्दल सकारात्मक दृष्टीकोण निर्माण करणारी. महिलाना भितीपासून मुक्त करणारी स्त्रियामध्ये क्रांतीकारी विचार रुजवनारी स्त्रियांना सामाजिक आर्थिक राजकिय व शैक्षणीक प्रक्रियेत सहभागी करुन घेवून त्यांना स्वावलंबी बनवनारी प्रक्रिया होय.

**संशोधनाची उद्दीष्टये :-**

1) भारतीय स्त्रियांच्या पारतंत्र्याची कारणे शोधुन आढावा घेणे.
2) भारतीय स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मीक व सांस्कृतीक दर्जाचा आढावा घेणे.
3) भारतीय स्त्रीयांच्या सबलीकरणासाठी समाज सुधारकानी केलेल्या कार्यांचा आढावा घेणे.

**गृहीतके :-**

भारतीय स्त्रियांच्या स्थितीगतीचा अभ्यास करणे.

भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्री सबलीकरणासाठी कार्यरत असनाऱ्या विविध सामाजिक संघटनांचा अभ्यास करणे.

I/C PRINCIPAL
...ndra Mahavidyalaya

स्त्री सबलीकरणासाठी भारतीय समाज सुधारकांच्या कार्यांचा अभ्यास करणे.

**संधोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी द्वितीय साधनाचा उपयोग केला आहे. पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींचा आधार घेतला आहे.

**महिला सबलीकरणा समोरील आव्हाणे :-**

1) महिलांचा सामाजिक आर्थिक व राजकीय दर्जा उंचावण्याचा प्रयत्न. शासकीय पातळीवरुन होत आहे. परंतु महिला नेतृत्वाच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित येले जात आहेत.
2) महिलांचा दर्जा उंचावला पण सामाण्य महिलांना न्याय मिळाला काय ?
3) महिलांना स्वातंत्र्य, स्वंय निर्णय स्वातंत्र्य दिले जात नाही.
4) महिलांना समाजबंधनातून मुक्त करुन पूर्णपणे स्वतंत्र अधिकार मिळवून देणे.
5) महिलांच्या विविध समस्यांची सोडवनूक करुन त्यांना समाधानी करणे.
6) महिलांना स्वंय संरक्षणासाठी पूर्ण अधिकार देणे.
7) महिलांना शैक्षणिक स्वातंत्र्याच्या द्विधा अवस्थेतून मुक्त करणे.
8) महिलांचा दर्जा सुधारला असला तरी स्त्री पारंपारीक विचारातून बाहेर पडली नाही.

उपाय :-

1) महिला सबलीकरणासाठी समाजाची मानसीकता बदलली पाहीजे.
2) महिला सबलीकरणासाठी शैक्षणीक प्रसार आणि प्रचार झाला पाहीजे.
3) महिलांचा सहभाग वाढण्यासाठी महिला मेळावे, चर्चासत्र, संबोधन परिषदा घेण्यात याव्या.
4) महिलांना स्वातंत्र्य मिळाले तर सामाजिक प्रगतीस अडथळा येणार नाही.
5) महिला सबलीकरणाच्या कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.
6) महिलांना विविध क्षेत्रात रोजगारांची संधी निर्माण करुन द्यावी.
7) महिलांना पूर्णपणे स्वावलंबी जिवन जगता आले पाहिजे.

निष्कर्ष :-

महिला सबलीकरणासाठी कायद्याची अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे. कायद्यामुळे स्त्री स्वावलंबी बनत आहे. स्त्री जिवनात अनेक प्रकारचे बदल घडून येत आहेत. महिलांच्या सामाजिक आर्थिक शैक्षणीक दर्जामध्ये सुधारणा होत आहे. महिलांच्या विविध क्षेत्रात सहभागामुळे कुटुंब समाज व राष्ट्र विकसीत होण्यास मदत होत आहे.

संदर्भ ग्रंथ :-


1. डॉ.सुधा काळदाते - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.
2. अरुन तिवारी - नारी सशक्तीकरण : भ्रम और सत्य.
3. महाजन टी. टी - मध्ययुगीन भारतातील स्त्री जिवन.
4. शालीनी तिवारी - भारतीय महिलाओंकी दिशा एवं दशा.
5. ताराबाई शिंदे - स्त्री - पुरुष तूलना
6. प्रा.रेखा हिंगोले - महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय.
7. प्रा.निता पांडे - महिला व मानव अधिकार


I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Tq Kallam

# RESEARCH JOURNEY

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S
UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL



Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Visit to - www.researchjourney.net
SWATIDHAN PUBLICATION

I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Tq. Kallam

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol. ( II )
12 January 2019 Special Issue – 92

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान



राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Prof. Gangane R.V.
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

Dr. M.S. Kamble
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN PUBLICATION
Visit to - www.researchjourney.net

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol II

12 January 2019

SPECIAL ISSUE – 92

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Prof. Gangane R.V.**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. M.S. Kamble**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya
Shiradhon Tq Kallam

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | आई जिजाऊ माँ साहेब | प्रा.डॉ.कंधारे विश्वास | 7 |
| 2. | मराठवाडयातील कामगार चळवळतील कॉ. करुणा चौधरी यांचे कार्य | प्रा. डॉ. संतोष पहारे | 9 |
| 3. | वैदिकसंस्कृतीकालीनस्त्रीयांचा दर्जा व विवाह संस्था | प्रा.डॉ.सुरेश कातळे | 11 |
| 4. | भारतीय क्रांतीकारी चळवळीतील स्त्रियांची भूमिका | प्रा.केशव अंबादास लहाने | 13 |
| 5. | 1857 च्या उठावातील राणी लक्ष्मीबाईचे योगदान | प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख | 16 |
| 6. | महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारातील स्त्री-पुरुष समानता | डॉ.मनिषा बंडुराव रोकडे | 19 |
| 7. | मराठ्यांच्या इतिहासातील आद्य कर्तृत्वान स्त्री- उमाबाई भोसले | प्रा.डॉ. सावंत के.डी. | 20 |
| 8. | मराठ्यांच्या इतिहासातील यशुबाईचे कार्य | प्रा. चव्हाण आर.ए. | 22 |
| 9. | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान | प्रा. मिलिंद व्यंकटी घाडगे | 24 |
| 10. | 19 व्या शतकाच्या स्त्री शिक्षणातील पंडिता रमाबाई यांची भूमिका व कार्य | प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र | 26 |
| 11. | मध्ययुगीन कालीन एक प्रभावी महिला: रझिया सुलताना | डॉ. शेख हुसैन इमाम | 28 |
| 12. | भारतीय स्त्री सुधारणा चळवळ | प्रा.प्रमोद चव्हाण | 30 |
| 13. | आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग व भूमिका | डॉ. प्रशांत अ. साबळे | 32 |
| 14. | सत्यशोधक चळवळ आणि स्त्रियांचे कार्य एक अवलोकन | प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे | 35 |
| 15. | सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य व विचार एक अभ्यास | डॉ.पठाण झेड. ऐ. | 37 |
| 16. | जानकीबाई आपटे यांचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान | प्रा. डॉ.गट्टी जी.व्ही., डॉ.नाईक एन.डी. | 40 |
| 17. | 19 व्या शतकांतील स्त्रीवादी पत्रकारितेचा शोध | डॉ.कुलकर्णी भालचंद्र गोंविदराव | 42 |
| 18. | स्त्री सबलीकरणा संदर्भात ताराबाई शिंदे चे योगदान | डॉ. राजेश करपे , प्रा. शेडगे के. डी. | 45 |
| 19. | भारतीय स्वातंत्र्यलढा आणि भारतीय स्त्रीयांची भूमिका | प्रा.डॉ.लक्ष्मीकांत जिरेवाड | 47 |
| 20. | मराठेशाहीच्या इतिहासातील महान व्यक्तिमत्व : राष्ट्रमाता जिजाबाई | सहा. प्रा. कलाणे कांतराव किसनराव | 49 |
| 21. | शिवकालीन स्त्रियांचे कार्य : महाराणी जिजाबाई | श्रीमती सरवदे वर्षा तात्यासाहेब | 52 |
| 22. | महाराणी येसुवाई | प्रा. पावडे खोब्राजी वामनराव | 54 |
| 23. | स्वराज्यहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या महाराणी येसूबाई | प्रा. रणदिवे डी. एम. | 57 |
| 24. | सत्यस्वरुप सगुणाबाई क्षीरसागर यांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान - एक अभ्यास | सुरेखा जावळे | 59 |
| 25. | संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात महिलांचे कार्य - एक आढावा | प्रा. डॉ. शारदा कदम | 61 |
| 26. | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्त्रीयाचे कार्य | प्रा. शिंदे हरिदास अर्जुन | 63 |
| 27. | सत्यशोधक चळवळ आणि स्त्री सुधारणा - एक आढावा | प्राचार्य डॉ. बबन पवार | 65 |

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | 12 January 2019 | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# 1857 च्या उठावातील राणी लक्ष्मीबाईचे योगदान

*प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख*
इतिहास विभाग प्रमुख, शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण. ता. कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना:-**

प्राचीन काळापासून महिलांच्या बाबतीत सक्षमिकरण करण्यासाठी त्या त्या शासकांनी उपाययोजना केल्या आहेत तसेच महिलानी देखील आपले शौर्य पणाला लावून भारतीय इतिहासात आपले नाव सूवर्णाक्षराणी कोरले आहे. स्वत:च्या कर्तत्वाने जरी आपला ठसा महिलांनी उमठवला असला तरी तत्कालीन भारतीय समाज हा बुरसटलेल्या विचारांनी, अंधश्रध्देने, गुरफटलेला होता. भारतीय संस्कृती अधोगतीला पोहोचली होती. ज्या हिंदूस्थानात मराठे रजपुतांना परके समजत होते, तेथे राष्ट्रवादाचा उदय कसा होणार? जेथे वैयक्तिक स्वार्थासाठी राज्याच्या हितावर पाणी सोडणारे राघोबा व बाजीराव इंग्रजांचा आश्रय घेण्यास यत्कींचीतही मागे नव्हते तेथे स्वराज्याभिमान ही चीज कशी उत्पन्न होणार? जेथे समुद्रपर्यटन हा धार्मिक गुन्हा समजला जात असे, तेथे महिलांना स्वातंत्र्य कसे मिळणार? जेथे निरापराध तरुण विधवाना त्यांच्या पतीच्या शवाबरोबर बांधुन जिवंत जाळून टाकण्याच्या प्रकाराला धर्मकृत्य समजले जात होते तेथे व्यक्ती स्वातंत्र्य व महिलांचे सक्षमिकरण कसे होणार? असा प्रश्न पडतो. परंतु या सर्व प्रकारावर राणी लक्ष्मीबाई ने मात करुन भारतीय इतिहासात आपले नाव सुवर्णाक्षराणी कोरले.

**उद्दिष्ट्ये:-**

1) झांशी ची राणी लक्ष्मीबाई यांच्या पुर्वचरित्राचा अभ्यास करणे.
2) महिला या नात्याने लक्ष्मीबाईंच्या कार्यावर प्रकाश टाकणे.
3) -लक्ष्मीबाई यांच्या लष्करी प्रशिक्षणाचा अभ्यास करणे.
4) ब्रिटीशांच्या कुटनितीचा अभ्यास करणे.
5) 1857 च्या स्वतंत्र्य लढ्यातील लक्ष्मीबाई यांच्या भुमिकेवर प्रकाश टाकणे.
6) राणी लक्ष्मीबाई यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकणे.

**गृहितके:-**

1) भारताच्या इतिहासात राणी लक्ष्मीबाई यांचे कार्य फार मोलाचे आहे.
2) लहाणपणापासूनच लक्ष्मीबाई यांनी कवायतीचे प्रशिक्षण घेतलेले दिसून येते.
3) झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी झांशी संस्थानात बऱ्याच प्रमाणात सामाजिक कार्य केलेले दिसून येते.
4) ब्रिटीशांनी झांशी संस्थानाच्या बाबतीत विश्वासघात केलेला दिसून येतो.
5) स्वातंत्र्य लढ्यात एका महिलेने इंग्रजांच्या विरुध्द आपल्या अखेरच्या स्वासापर्यंत शस्त्रास्त्राने प्रतिकार केला.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. तसेच विविध संदर्भ ग्रंथ, लिखित साहित्य, वर्तमानपत्रे यांचाही उपयोग करण्यात आला आहे.

**जन्म:-**

"19 नोव्हेंबर 1835 रोजी उत्तरप्रदेशातील काशी येथे लक्ष्मीबाईचा जन्म झाला." त्यांचे मुळ नाव मनिकर्णिका तांबे हे होते. लक्ष्मीबाईच्या आईचे नाव भागीरथीबाई तर, वडीलांचे नाव मोरोपंत तांबे हे होते. तांबे हे कुटूंब मुळचे सातारा जिल्ह्यातील धावडशी या ठिकाणचे होते.

**मणिकर्णिकाचे लष्करी शिक्षण:-**

1. घोडेस्वारी:-

मणिकर्णिका हिने लहाणपणापासूनच घोडेस्वारीचे प्रशिक्षण घेतले. थोड्याच अवधित ती पुढे उत्तम दर्जाची घोडेस्वार म्हणून लौकिक झाली. घोडेस्वारीचे सर्व खाचखळगे तीला माहित झाले. "तत्कालीन काळात मणिकर्णिका, नानासाहेब पेशवे व जयाजी शिंदे या तिघांशिवाय इतर कोणीही उत्तम दर्जाचा घोडेस्वार भारतात नव्हता. "[2]

2. युध्दकलेचे शिक्षण:-

मणिकर्णिका हिने सुरुवातीपसूनच घोडेस्वारीबरोबरच युध्दकलेचे प्रशिक्षण घेतले. तलवारबाजी, भालाफेक, बंदुक चालवणे, इ. प्रकारचे प्रशिक्षण घेतले. त्यांच्या कुटूंबाला राजकीय वारसा जरी मिळाला नसला तरी ते कुटूंब राजकीय घराण्याशी संबंधीत व्यक्तीमध्ये वावरलेले होते. त्यामुळे मणिकर्णिकेला युध्दकलेचे लवकरच ज्ञान प्राप्त झाले.

3. बाळंभट्ट देवधर यांचे कार्य:-

बाळंभट्ट देवधर हे उत्तम दर्जाचे कुस्तीपटू होते. तसेच ते मल्लखांब विद्येतही वाकबगार होते. मणिकर्णिकेला कुस्तीत व मल्लखांब विद्येत त्यांनी पारंगत केले. मनाची एकाग्रता, विलक्षण चपळता, शरीराचा तोल सांभळण्याचे पूर्ण कौशल्य, काटकपणा, इ. बाबतीत मानसिक दृष्ट्या बाळंभट्ट देवधर यांनी मणिकर्णिकेला सक्षम केले.

I/C PRINCIPAL

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान | 12 January 2019 | UGC Approved No. 40705

**विवाह (1842):-**

मणिकर्णिकेचा विवाह 1842 मध्ये झांशी संस्थानचे राजे गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी झाला. विवाहानंतर त्यांच्या पतीने म्हणजेच गंगाधररावानी मणिकर्णिकेचे नाव बदलून "लक्ष्मीबाई" असे ठेवले.

**लक्ष्मीबाईच्या मुलाचा मृत्यू (1851):-**

लक्ष्मीबाई व गंगाधरराव नेवाळकर यांना मुलगा झाला परंतू तो तीन महिन्याचा असतांना मृत्यू पावला. मुलाच्या जन्माच्या खुशीने आनंदीत असणारे गंगाधरराव मुलाच्या मृत्यूने अत्यंत दु:खी झाले.

**दत्तक मुलगा घेण्याचा निर्णय(1852):-**

झांशी संस्थनचे राजे गंगाधरराव व राणी लक्ष्मीबाई यांनी दु:खातून स्वत:ला सावरत सावरत आपल्या घराण्याचा वारसा चालवण्यासाठी मुलगा दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. गंगाधररावांनी वासुदेव नेवाळकर यांच्या मुलाला दत्तक घेतले. दत्तक घेतलेल्या मुलाचे नाव "दामोदर" असे ठेवण्यात आले.

**गंगाधरराव नेवाळकरांचे निधन(1853):-**

गंगाधरराव व राणी लक्ष्मीबाई यांनी दामोदर याला दत्तक घेतल्यानंतर आपल्या घराण्याला वारसा मिळाला या आनंदात असतांना गंगाधररावही पुढे जास्त काळ जगु शकले नाहीत. सन 1853 मध्ये त्यांनाही मृत्यूने कवटाळले. व पुन्हा एकदा लक्ष्मीबाईच्या जिवनात दु:खाचा डोंगर कोसळुन लक्ष्मीबाई विधवा झाल्या.

**दत्तक वारसा नामंजूर (खालसा धोरण):-**

"ब्रिटीश सरकारने भारतात दत्तक वारसा नामंजूर करण्याचा निर्णय घेतला."[4] या नियमानुसार राणी लक्ष्मीबाईच्या दत्तक घेतलेल्या मुलास ब्रिटीश गव्हर्नर जनरल डलहौसी याने झांशीचा वारस म्हणून नाकारले.

**राणी लक्ष्मीबाईचा पत्रव्यवहार:-**

पूर्वीपासूनच झांशीच्या ब्रिटीशांशी असणाऱ्या मैत्रिपूर्ण संबंधामुळे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी आपले संस्थान खालसा करणार नाही अशी अपेक्षा होती. त्यासाठी "राणी लक्ष्मीबाईनी स्वत: इस्ट इंडिया कंपनीशी पत्रव्यवहार केला"[5] या पत्रव्यवहारातून कंपनी सरकारचा अन्याय, बेकायदेशिरपणा आणि खोडसाळपणा राणीने उघड केला.

**झांशी संस्थान खालसा(13 मार्च 1854):-**

गव्हर्नर जनरल डलहौसी याने संस्थाने खालसा करण्याचा निर्णय घेतला असल्याने "झांशी संस्थान दिनांक 13 मार्च 1854 रोजी खालसा करण्यात आले. झांशीच्या जनतेला उद्देशुन जाहिरनामा काढण्यात आला." त्यानुसार दत्तक वारसा नामंजूर करुन झांशी संस्थान ब्रिटीश सरकारमध्ये विलीन करण्यात आले. याचवेळी राणीने "मेरी झांशी नही दुंगी" असे स्फुर्तीदायक उद्गार काढले.

**राणीला पारतंत्र्याची जाणीव:-**

ब्रिटीशांनी झांशी संस्थान खालसा केलेल्या राणी लक्ष्मीबाईला पारतंत्र्याची जाणीव सतत सतावत होती. ब्रिटीशांनी आपला विश्वासघात केला असे तिला वाटत होते. त्याचवेळी राणी लक्ष्मीबाई किल्ल्यावरुन झांशी नगरातील राजवाड्यात राहण्यासाठी गेल्या होत्या.

**खजीन्यावरील हक्क संपूष्टात:-**

झांशी संस्थान ब्रिटीशांनी खालसा केल्यानंतर एकेकाळची झांशी संस्थानची मालकीन असलेल्या राणी लक्ष्मीबाईचा स्वत:च्या खजिन्यावरचा अधिकार संपुष्टात आला. आपल्या दत्तक घेतलेल्या मुलाच्या मुंजीसाठी तिने आपल्याच खजीन्यातील एक लाख रुपये आपणास देण्याची इंग्रजाकडे विनंती केली. तेव्हा इंग्रजानी तिच्याकडे जामीन मागीतला.

**1857 चा उठाव व राणी लक्ष्मीबाई:-**

ब्रिटीशांनी "दत्तक वारसा हक्क नामंजुर" तत्व स्विकारुन अनेक संस्थाने खालसा केली. त्याला झांशी संस्थानही अपवाद राहिले नाही. इंग्रजांच्या अन्यायी जुलमी धोरणामुळे संपूर्ण भारतात ब्रिटीशांच्या विरुध्द वातावरण तयार झाले होते. म्हणूनच राणी लक्ष्मीबाईने या आलेल्या संधीचा फायदा घेण्याचे टरवले.

**झांशीतील हत्याकांड (6 जुन 1857):-**

1857 च्या सुमारास संपुर्ण भारतात इंग्रजांच्या विरुध्द उठाव झाला होता. झांशीत हिंदी शिपायानी इंग्रजाविरुध्द बंड पुकारुन मुठभर शिपायांनी इंग्रज अधिकाऱ्यांची कत्तल केली. त्यातुन वाचलेल्या इंग्रजांनी झांशीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. बंडवाल्यांनी इंग्रजांशी वाटाघाटी करुन त्यांना जिवदान देण्याचे आश्वासन दिले. पण पुढे जेव्हा इंग्रज किल्ल्यातुन बाहेर आले तेव्हा त्यांना विश्वासघाताने ठार केले.

**झांशीचा कारभार राणीकडे (1858):-**

इंग्रजांनी किल्ल्यात आपल्या लोकांना आश्रय दिल्याचे पाहून राणी प्रती सहानुभूती दाखवण्याचे नाटक केले. त्यांनी झांशी संस्थानची सुत्रे परत राणीकडे सुपूर्द केली. परंतू इंग्रजांचा हा डावपेच होता.

**राणी व इंग्रज यांच्यातील संबंध:-**

राणीकडे झांशीचा कारभार जरी सोपवला असला तरी, इंग्रज हे झांशीतील झालेली इंग्रज अधिकाऱ्यांची कत्तल हि राणीनेच घडवून आणलेली आहे असे त्यांना वाटत होते. त्यादिशेने ते राणीच्या विरुध्द पुरावे गोळा करु लागले व तिच्या भवतालचा फास आवळू लागले.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

इंग्रजांच्या या कुटनितीची कुनकूण राणीला लागली झांशीच्या कत्तलीचा आरोप आपणावर ठेवून इंग्रज आपणास फाशी देणार याबद्दल तिची खात्री झाली. तेव्हा असे नामुष्कीचे मरण पत्करण्यापेक्षा इंग्रजांशी लढून मरण पत्करण्याचे तिने ठरवले.

**सर ह्यु रोज चा किल्ल्याला वेढा(21 मार्च 1858):-**

झांशी लढवण्याची राणीने पूर्ण लष्करी तयारी केली. "इंग्रज सेनानी सर ह्यु रोजच्या अधिपत्त्याखाली इंग्रजी फौजांनी झांशीवर आक्रमण केले. झांशीच्या किल्ल्याला त्याने वेढा दिला. राणी मोठ्या पराक्रमाने किल्ला लढऊ लागली."[7] इंग्रजांनी धैर्याने लढून झांशी किल्ल्याच्या तटबंदीस खिंडार पाडले. इंग्रज फौज आत शिरुन लुटालूट व कत्तल करु लागले. राणी आता इंग्रजांच्या हाती लागणार असे वाटत असतांनाच मोठ्या शिताफीने घोड्यावर स्वार होऊन किल्ल्याच्या बाहेर पडली. झांशी शेवटी इंग्रजांच्या ताब्यात आली.

**बंडवाल्याचे राणी द्वारा नेतृत्व:-**

अविश्रांत घोडदौड करुन राणी प्रथम काल्पीला पोहचली. तेथे नानासाहेब, तात्या टोपे, बांदाचा नवाब, व इतर बंडवाल्याचे नेते एकत्रित जमले होते. लवकरच सर ह्यु रोजच्या फौजेशी त्यांच्या दोन मोठ्या लढाया झाल्या एका लढाईत खुद राणीने लष्कराचे नेतृत्व केले होते. दोन्ही लढायात बंडवाल्याचा पराभव झाला. शेवटी ह्यू रोजने काल्पी जिंकली राणी व तात्या टोपे ग्वाल्हेरकडे आले.

**ग्वाल्हेरची लढाई व राणीचे विर मरण(17 जून 1858):-**

काल्पीच्या पराभवानंतर राणी लक्ष्मीबाई स्वस्त बसल्या नाहीत. तेथेही त्यांनी आपल्या सैन्याची कवायत नियमीत चालू ठेवली. सैन्यामध्ये फिरुन सैनिकांची चौकशी करीत इंग्रजांना रोखण्यासाठी कशाप्रकारे मोर्चेबांधणी करावी याविषयी त्यांनी चर्चा केली याचवेळी दिनांक 17 जून 1858 रोजी सकाळीच ब्रिटीश अधिकारी स्मिथ व ह्यू रोज आपल्या सैन्यासह ग्वाल्हेरच्या अगदी जवळ येऊन पोहचले. ब्रिटीश सैनिकांनी त्वरीत राणीच्या सैन्यावर हल्ला केला. लक्ष्मीबाईनी देखील रणांगणात धाव घेतली. सपासप इंग्रज सैन्यावर वार करत शत्रु सैन्य स्वत: कापून काढले. विजेसारख्या तळपणाऱ्या राणीकडे पाहून त्यांचे सैन्यही त्वेशाने लढले. इंग्रज सैन्य मागे हटणारच होते त्याच वेळी नव्या दमाची एक फौज शेजारील टेकडीवरुन चालून आली. दोन्हीकडून आलेल्या सैन्यासमोर राणीचा टिकाव लागला नाही. रणांगणावरील परीस्थीतीचे गांभिर्य लक्षात घेऊन राणी लक्ष्मीबाई आपल्या निवडक सैन्याच्या मदतीने घोड्यावर स्वार होऊन बाहेर पडल्या. थोडे अंतर पुढे गेल्यानंतर एका लहाणशा ओढ्याजवळ राणीचा घोडा आडला. नेहमीचा घोडा या युध्दात त्यांच्या जवळ नव्हता. बऱ्याच प्रयत्नानंतरही घोडा पुढे जाऊ शकला नाही. तिथेच मागून येणाऱ्या सैनिकाशी रणकंदन झाले. राणी रक्तबंबाळ झाली. व घोड्यावरुन खाली कोसळली. राणीच्या डाव्या कुशीत तलवार घुसली. परंतु पुरुषाच्या वेशात असलेल्या राणी लक्ष्मीबाई यांना इंग्रज ओळखु शकले नाहीत. ते पुढे निघुन गेले. राणीच्या एका सैनिकांने तिला उचलुन एका मठात आणले. राणीवर उपचार सुरु करण्याचा प्रयत्न केला. परंतु राणीची उपचार घेण्याची इच्छा नव्हती. आपला देह ब्रिटीशांच्या ताब्यात जाऊ नये अशी त्यांची इच्छा होती. राणीच्या इच्छेनुसार मठातील सेवकाने तिच्या पर्थीवाला 17 जुन 1858 रोजी मुखाग्नी दिला.

**निष्कर्ष:-**

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील राणी लक्ष्मीबाई यांनी परकीय सत्तेविरुध्द सशस्त्र लढा दिला.
2. शत्रुलाही हेवा वाटेल अशाप्रकारचे महान कार्य झांशीची राणी लक्ष्मीबाई यांनी केले.
3. एक महिला या नात्याने मानसीक दृष्ट्या किती सक्षम बनू शकते हे राणी लक्ष्मीबाई यांच्या कार्यावरुन दिसून येते.
4. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रातीकरकांची स्फुर्तीदेवता म्हणून आपण राणी लक्ष्मीबाईकडे आदराने पाहतो.

**सारांश:-**

भारताच्या इतिहासात एक स्त्री इतिहास घडवू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे राणी लक्ष्मीबाई होय. परकीय सत्तेविरुध्द स्वत:च्या अखेरच्या स्वासापर्यंत त्यांनी लढा दिला. त्यांचे शौर्य पाहूण रणांगणावरील शत्रु **ह्यू रोज** यांनी राणी बद्दल गौरोद्गार काढतांना म्हटले **"Although a leady she was the Bravest and military of the rebels a man among the mutineers."** तसेच **न. र. फाटक** म्हणतात की, **"एखादा तेजोगोल स्थानभ्रष्ट होऊन आंतरीक्षातून ज्यावेळी चकाकतो, त्याच्या गतीमागे पुष्कळ वेळेपर्यंत एक तेजोरेषा चमकत राहते, त्याप्रमाणे लक्ष्मीबाईचे तेजस्वी चरीत्र इतिहास दृष्ट्या आल्पकालीन असले तरी त्यांची माहिती चिरकालीन आहे."**

**संदर्भ सुची:-**

1) The Queen of Jhansi, Mahaswetadevi page no 23.
2) झांशीची राणी लक्ष्मीवाई, दा. वि. कुलकर्णी पृ. क्र. 46.
3) झांशीची राणी लक्ष्मीवाई, प्रतिभा राणडे. पृ. क्र. 73.
4) भारताचा इतिहास (1750 ते 1950), डॉ. एस. एस. गाटाळ. पृ. क्र. 65.
5) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, डॉ. जयसिंग पवार. पृ. क्र. 35.
6) कित्ता पृ. क्र. 35.
7) विरांगणा लक्ष्मीवाई, रामाश्रय सविता. पृ. क्र 140.

I/C PRINCIPAL
Sharadchandra Mahavidyalaya